# जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनर्निर्माण योजना
# माहिती

**२६ ऑगस्ट २०११**

प्रज्ञा शिदोरे

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(शासनव्यवस्थेच्या नीलप्रतीसाठी)

# जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनर्निर्माण योजना

## संकल्पना

भारताचे झपाट्याने शहरीकरण होते आहे, या वाढत्या शहरांमधील मूलभूत सोयींच्या विकासासाठी केंद्रशासनाने 'जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनर्निर्माण योजना (जेएन्एन्यूआरएम)' अस्तित्वात आणली. भारत सरकारचा 'कॉमन मिनीमम प्रोग्रॅम', संयुक्त राष्ट्र संघाचा 'सहस्राब्दी विकास कार्यक्रम' आणि शहरी भारताच्या विकासाच्या गरजांनी या योजनेचे औचित्य साधले आहे. या योजने संतर्गत २००१ च्या जनगणने नूसार ४० लाखांच्या वर असणारी शहरे (७), १० लाखांहून जास्त पण ४० लाखांहून कमी लोकसंख्येची शहरे (२८) तसेच काही इतर महत्वाची निवडक शहरे व ऐतिहासिक महत्वाच्या (२८) शहरांची निवड करण्यात आली आहे. या ६३ क्षेत्रांना २००५-०६ पासून १७२१७.५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

जेएन्एन्यूआरएमचा मूळ उद्देश शहरी शासन तसेच शहरी सेवांच्या वितरणामध्ये सकारात्मक बदल आणण्यासाठी आहे. या उद्देशाने या स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या क्षेत्राच्या विकासासाठी ही योजना संपल्यावर स्वयंपूर्ण होऊ शकतील. म्हणून ही विकास योजना यशस्वी करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांबरोबरच तिथल्या राज्य सरकारनेही लक्ष पुरवणे अपेक्षित आहे. या मध्ये पी.पी.पी सारख्या योजनांना प्राधान्य देण्याची गरज आहे.

## योजना

भारतातल्या ठराविक शहरांचा सुधार आणि वेगवान वियोजित विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी, या शहरांमध्ये मूलभूत सुविधांच्या निर्माणासाठी, नागरिकांचा या विकास कार्यक्रमामध्ये सगभाग वाढविण्यासाठी तसेच नागरिकांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची जवाबदारी वाढविण्यासाठी ही योजना राबविण्यात येते आहे.

## उद्देश

जेएन्एन्यूआरएम ची उद्दीष्टे खालील प्रमाणे:

क. योजनेच्या संतर्गत शहरांमध्ये एकसंध विकासाला चालना देणे
ख. या शहरांच्या दीर्घकालीन विकासाकडे लक्ष पुरविणे.
ग. शहरातल्या मुलभूत सुधारांसाठी निधीची व्यवस्था करणे.
घ. शहराच्या नव्या भागांच्या नियोजित विकासाने वाढत्या शहरीकरणाला योग्य दिशा देणे.

ङ. नागरी सोयी-सुविधांचा विकास त्याचबरोबर शहरी गरीबांकडे विशेष लक्ष.

च. शहरातली कोंडी कमी करण्यासाठी जुन्या शहराच्या पुनर्निर्माणाकडे विशेष लक्ष पुरविणे.

छ. जीवनावश्यक गोष्टींच्या दरांवर नियंत्रण, मुलभूत सोयी जसे गृहनिर्माण, पिण्याचे पाणी, सार्वजनिक स्वच्छता शहरी गरिबांना सोयी तसेच सरकारच्या अन्य सेवा पोचविणे.

## योजने अंतर्गत करण्याची कामे

क. विकास आराखडा तयार करणे: प्रत्येक शहराने आपल्या गरजेनुसार, विविध विकास कार्यक्रमांचे नियोजन त्याला लागणाऱ्या अपेक्षित खर्चा बरोबर केले पाहिजे. याला त्या शहराचा 'विकास आराखड" म्हणण्यात येईल.

ख. विकास आराखड्यात दिल्या गेल्लेल्या कामांचे योग्य नियोजन करणे. हा रिपोर्ट स्थानिक स्वराज्य संस्था, नागरिक व संबंधित तज्ञांना बरोबर घेऊन करण्यात यावा.

ग. निधीचे व्यवस्थापन केंद्रशासन, राज्यशासनाच्या नोडल एजन्सीज द्वारे केले जाईल.

## या योजने अंतर्गत कोणत्या योजना राबविल्या जाऊ शकतात?

क. शहराचे पुनर्निर्माण: कोंडी कमी करण्यासाठी गल्ल्या मोठ्या करणे, शहराच्या नवीव भागामधील विकासकामे, मंडयांचे स्थलांतरण, पीण्याच्या पाण्याच्या पाईप बदलणे तसेच जलनिस्सारणाची कामे करता येऊ शकतात.

ख. पाण्याचे व्यवस्थापन तसेच जलशुध्दीकरणाच्या योजना.

ग. पुराच्या पाण्याच्या निचऱ्यासाठी सोयी.

घ. रस्ते व महामार्गांचा तसेच परिवहनाच्या सुविधांचा विकास .

ङ. पी.पी.पी च्या आधारे पार्किंगच्या सोयी.

च. ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी

छ. झोपडपट्टी विकास तसेच स्वस्त घर योजना.

ज. शहरी गरिबांसाठी मूलभूत सोयी करणे.

झ. सांडपाणी, पिण्याचे पाणी, ड्रेनेज तसेच सार्वजनिक शौचालयांची सोय करणे.

ञ. रस्त्यावरचे दिवे

ट. सामुदायीक भवन, बालभवन, ईत्यादी सामुदायीक सुविधा

ठ. शहरी गरिबांसाठी स्वास्थ्य, शिक्षण तसेच सामाजिक सुरक्षिततेसाठी सोयी करणे.